सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५

ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

जा.क्र/जिवानिशा/वाहतूक अधिसुचना/४८७/२०२५ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - ३०/१०/२०२६

अधिसूचना

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असणारा वडुथ - सातारा रोड - अंबवडे (सं) - किन्हई (प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ३६) या रस्त्यावर किमी ०५/५०० येथे वसना नदीवर नवीन पुलाचे काम सुरु होणार असलेने सदर मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णतः बंद करुन पुलाचे काम पुर्ण करणे आवश्यक आहे. सदर पुलाचे काम पुर्ण होण्याकरीता नऊ महिने कालावधी लागणार असलेने तो पर्यत नागरीकांची तसेच वाहनचालकांची गैरसोय होवु नये याकरीता सदर मार्गावरील वाहतुकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्या करीता पर्यायी मार्गाची उपलब्धता असलेने सदर मार्गावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी निखील पिंगळे भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये वडुथ - सातारा रोड - अंबवडे (सं) - किन्हई (प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ३६) या मार्गावरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतूक सुरळीत राहणेकरीता दि.०१/११/२०२६ चे ००.०१ ते ३१/०७/२०२७ चे २३.५९ वा. पर्यत खालील अधिसूचना पारित करीत आहे.

वाहतूक मार्गातील बदलाबाबत

वाहतूक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. वडुथ वरुन सातारा रोड व किन्हई कडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही वडुथ - भिमनगर फाटा - पाडळी - जळगाव - सातारा रोड - अंबवडे (सं) वरुन किन्हई कडे जाईल.
२. किन्हई व सातारा रोड वरुन वडुथ कडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही किन्हई - सातारा रोड - जळगाव - पाडळी - भिमनगर फाट्यावरुन वडुथ कडे जाईल.
३. वडुथ वरुन कोरेगाव कडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही वडुथ - भिमनगर फाटा - पाडळी - जळगाव वरुन कोरेगाव कडे जाईल.
४. कोरेगाव वरुन वडुथ कडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही कोरेगाव - जळगाव - पाडळी - भिमनगर फाट्यावरुन वडुथ कडे जाईल.
५. वसना नदीवरील पुलाच्या दोन्ही बाजुस १०० मिटर पर्यतचा रस्ता हा सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णतः बंद करण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांबाबत सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक ३०/१०/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक सत्यमेव जयते सातारा

(निखील पिंगळे) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा

दिनांक - ३०/१०/२०२६

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे

२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

४) मुख्य अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग सातारा

५) उपविभागीय अधिकारी कोरेगाव उपविभाग कोरेगाव

६) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

७) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

१) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

२) मा.जिल्हाधिकारी सातारा.

३) पोलीस अधीक्षक, महामार्ग परिक्षेत्र पुणे.

४) मा. विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ सातारा

Scanned with OKEN Scanner